# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : १६/०८/२०२३

# प्रेसनोट

'मेरी माटी, मेरा देश' अभियानाची घोषणा मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केली आहे. सदर अभियानाचा उद्देश्य देशासाठी आपले जीवन बलिदान केलेल्या भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि वीरांचा सम्मान करणे हा आहे. त्याअन्वये दि. १६ ऑगस्ट २०२३ रोजी शहिद अरुण कुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल), उल्हासनगर-२ येथे उल्हासनगर महापालिकेमार्फत एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रमाची सुरूवात मा.आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व थोर व्यक्ती/राष्ट्रपुरुष यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

सदर कार्यक्रमाची प्रस्तावना अतिरिक्त आयुक्त (सेवा) डॉ.करूणा जुईकर यांनी प्रोजेक्टरद्वारे सादर केली. त्यामध्ये दिनांक ०९ ते १५ ऑगस्ट पर्यंत 'मेरी माटी, मेरा देश' अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमांचे थोडक्यात परंतु अर्थपूर्ण विवेचन त्यांनी केले. यामध्ये विशेषत: वेदांत कॉलेजमधील "क्रांती दौड" च्या विद्यार्थ्यांचे कौतुक अतिरिक्त आयुक्त (सेवा) डॉ. करुणा जुईकर यांनी केले.

त्यानंतर उपस्थित स्वातंत्र्य सेनानी मा. श्री. अनाथ बंधू यांची कन्या श्रीम. मीता चक्रवर्ती (विश्वास), मा.श्री.तानाजी पवार, पॅरामिर कमांडर, मा.श्री.शिवाजी बाळा ओहाळ, राष्ट्रपती पदक सन्मानित, मा.श्री.उत्तम वासुदेव सातारडेकर, गोवामुक्ती संग्राम, स्वातंत्र्य सेनानी, मा.श्री.नेवेंद्रम नागदेव यांचे नातू श्री.नागदेव, मा.श्री. प्रमोद टाले यांचे वडील स्वातंत्र्य सेनानी असल्याने त्यांचा सत्कार व माजी नगरसेवक यांचा सत्कार मा.आयुक्त, श्री. अजीज शेख यांनी केला.

महापालिकेचे कर्मचारी श्री.रामवीर करोतीया व श्री. रमेश आव्हाड व इतर कलाकारांनी देशभक्तीपर गीते सादर केली. महापालिकेच्या सर्व शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वर्गाने देशभक्तीपर गीतांच्या आधारे देशाची अखंडता व बंधुभाव याविषयी प्रबोधन करून प्रेक्षकांमध्ये जनजागृती निर्माण केली. त्यामध्ये सर्वांचे अभिनय कौशल्य व नृत्य कला यांचे दर्शन घडले. भारतातील सर्व राज्यांमधील वेशभूषेद्वारे सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला. विशेत: लहान मुलांनी केलेले नृत्य व अभिनयांनी सर्व प्रेक्षकांची मने जिंकली. शिक्षण मंडळाचे हे सादरीकरण कौतुकास्पद ठरले.

त्यांनतर भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त आयोजीत केलेल्या निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, म्हणी व उखाणे स्पर्धांमध्ये विजयी झालेल्यांचा सत्कार मा. आयुक्त यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. श्रीगणेशोत्सव स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या मंडळांस धनादेश देऊन सत्कार करण्यात आला. सदर पारितोषिक वितरणाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी सौ.छाया डांगळे यांनी केले. तसेच इतर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महापालिका सचिव सौ. प्राजक्ता कुलकर्णी यांनी केले.

सदर कार्यक्रमाचे व्यवस्था व नियोजन जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे व जनसंपर्क विभागातील सर्व कर्मचारी यांनी केले.

सदर कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त (सेवा) डॉ. करूणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. अशोक नाईवाडे, उप-आयुक्त (आरोग्य) डॉ. सुभाष जाधव, सौ. प्रियंका राजपूत, उप-आयुक्त (कर), श्री. भिलारे, मुख्य लेखाधिकारी, श्री. देशमुख, उप मुख्य लेखाधिकारी, सौ. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर यांनी सर्व उपस्थितांचे आभारप्रदर्शन करून केली.

महापालिका कर्मचारी यांनी प्रेक्षक म्हणून सदर कार्यक्रमास "हाऊस फुल" प्रतिसाद दिला. एकंदरीत सदर कार्यक्रम हा केवळ मनोरंजनाचाच विषय न राहता, आपल्या देशाविषयी जाज्वल्य भावना, प्रेम, अभिमान व कर्तव्याची जाणीव उपस्थितांमध्ये वृध्दींगत करणेस सदर कार्यक्रम यशस्वी झाला असेच थोडक्यात म्हणता येईल.

16/8/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.